# मिरजेत वसुंधरा महोत्सवास प्रारंभ

## पर्यावरणपूरक अनेक उपक्रमांचे आयोजन

मिरज, ता. २२ : क्लब वसुंधरा आणि किर्लोस्कर उद्योग समूहाच्या वतीने प्रत्येक वर्षी आयोजित होणाऱ्या वसुंधरा फिल्म फेस्टिव्हल महोत्सवास मिरजेत नुकताच प्रारंभ झाला. येथील निसर्गसवांद आणि सिनेसंवाद या दोन संस्थांच्या पुढाकाराने हा महोत्सव मिरजेत होतो. रविवारपर्यंत (ता.२३) हा महोत्सव चालणार आहे.

पर्यावरण पूरक गणपती उपक्रमांतर्गत कलाशिक्षिका आणि मूर्तिकार ऐश्वर्या वसगडे यांनी शालेय विद्यार्थ्यांना शाडूचा गणपती बनविण्याचे प्रशिक्षण दिले. याचे आयोजन विनीता करमरकर, अनघा राजोपाध्ये, विलास शेटे, आनंद लेले, राजेंद्र जोशी, अमित पटवर्धन, अविनाश चौगुले, हेही उपस्थित होते. याच महोत्सवानिमित्त विलास शेटे यांच्या हिंदमाता चौकातील पिकॉक फोटो स्टुडिओमध्ये निसर्गावरील अत्यंत आकर्षक छायाचित्रांचे प्रदर्शन झाले.



**मिरज : येथील वसुंधरा महोत्सवात विद्यार्थ्यांना शाडूचा गणपती बनविण्याचे प्रशिक्षण मूर्तिकार सौ. ऐश्वर्या वसगडे यांनी दिले.**

या महोत्सवांतर्गत येथील डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, आयडियल इंग्लिश स्कूल, विद्यामंदिर प्रशाला, ज्युबिली कन्या शाळा, या ठिकाणी दोन सत्रांमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेले पर्यावरण संवर्धन विषयक चित्रपट सकाळी नऊ आणि दुपारी तीन वाजता अशा दोन सत्रात विद्यार्थ्यांना दाखविण्यात येणार आहेत. शनिवारी (ता.२३) 'रुग्ण सेवा प्रकल्प' या संस्थेस वसुंधरा मित्र पुरस्कार, डॉ. हर्षला पटवर्धन यांना वसुंधरा सन्मान पुरस्कार देण्यात येणार आहे. रविवारी (ता.२४) सायकल फेरीने महोत्सवाची सांगता होणार आहे.